# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर



Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२७ फेब्रुवारी, २०१९

☎ : 07172-264300
📠: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)


## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक २६/०२/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **घुग्घुस, वरोरा, भद्रावती, पाथरी, सिंदेवाही, पोंभुर्णा, सावली, गोंडपिंपरी, लाठी, विरूर, पडोली, राजुरा, बल्लारशाह** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१६** गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **९३,५००/—रू.** चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

## चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

### १) पोलीस स्टेशन सिंदेवाही :—

दिनांक **२६/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **सिंदेवाही** अंतर्गत बाजार चौक येथे ०१ आरोपी हा सटट्ापटट्ी आकडयावर पैशाची बाजी लावुन जुगारचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **सिंदेवाही** येथे अप. क्र. **१२१/२०१९** कलम १२ मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यासह नगदी असा एकुण **४२५/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **सिंदेवाही** पोलीस करीत आहे.

---

### २) पोलीस स्टेशन बल्लारशाह :—

दिनांक **२६/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **बल्लारशाह** अंतर्गत ०१ आरोपी हा सटट्ापटट्ी आकडयावर पैशाची बाजी लावुन जुगारचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो. स्टे. **बल्लारशाह** येथे अप. क्र. **२२९/२०१९** कलम १२ मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यासह नगदी असा एकुण **२५,१८०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **बल्लारशाह** पोलीस करीत आहे.

---

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस शिक्षा

पोलीस स्टेशन सिंदेवाही अंतर्गत फिर्यादी अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस २७/०२/२०१९ रोजी **कु.स.ज. अन्सारी, जिल्हा सत्र न्यायाधीश, जि. चंद्रपुर यांनी** शिक्षा ठोठावली.

दिनांक १२/०९/२०१३ रोजी फिर्यादी अल्पवयीन मुलगी शाळेत जात असतांना यातील **आरोपी नामे अमीत निलकंठ कोवळे वय २५ रा. वासेरा, सिंदेवाही** हा फिर्यादीच्या शाळेच्या मार्गावर थांबुन ती शाळेत जात असतांना तिला अश्लील बोलुन तिचा विनयभंग केला. अशा फियादीच्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिंदेवाही येथे अप. क्र. ७७/२०१३ कलम ३५४(अ)(२),(४) भादंवि, सहकलम ११ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पोहवा. भुपेंद्र लेनगुरे, पोस्टे सिंदेवाही यांनी गुन्हयातील आरोपीस निष्पन्न करून आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक ०२/११/२०१८ रोजी **आरोपी नामे अमीत निलकंठ कोवळे वय २५ रा. वासेरा, सिंदेवाही यास** ३५४(अ)(२),४ भादंवि अनुक्रमे २ वर्ष व ६ महिने शिक्षा आणि १,०००/—रू दंड न भरल्यास ०६ महिने शिक्षा **कु.स.ज. अन्सारी, जिल्हा सत्र न्यायाधीश, जि. चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. श्री. देवेंद्र महाजन, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** यांनी काम पाहीले असुन कोर्ट पैरवी म्हणुन **सफौ. रमेश मुक्कावार. पोस्टे सिंदेवाही** यांनी काम पाहिले.

---

चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
२७ फेब्रुवारी, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# पोलीस भरती पुर्व प्रशिक्षणाचा समारोप समारंभ सपंन्न

आज दिनांक २७/०२/२०१९ रोजी पोलीस मुख्यालय चंद्रपुर येथे एक महिन्यापासुन सुरू असलेल्या पोलीस भरती पुर्व प्रशिक्षणाचा समारोप समारंभ पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेडड्ी यांचे अध्यक्षतेखाली पार पडला.

सदर शिबीरामध्ये चंद्रपुर जिल्हयातील १७० आदिवासी विद्यार्थांचा सहभाग होता. सहभागी विद्यार्थ्यांना पोलीस मुख्यालय चंद्रपुर येथे पोलीस प्रशिक्षकांद्वारे दररोज कवायत, योगा, कराटे आणि मैदानी चाचणी बाबत प्रशिक्षण देण्यात आले असुन सहभागी विद्यार्थ्यांना शुज आणि ट्रॅक सुट वाटप करण्यात आले. त्याच बरोरबर राणाज स्पर्धा क्लासेस, चंद्रपुर यांचे प्रतिनिधीद्वारे लेखी परिक्षेबाबत मार्गदर्शन करून लेखी चाचणी सुध्दा घेण्यात आली. सहभागी विद्यार्थी मुले मुली यांचे करीता राहण्याची आणि जेवण्याची व्यवस्था या पोलीस मुख्यालय चंद्रपुर येथे करण्यात आली होती. दिवसभर चालणाऱ्या या शिबीरात विद्यार्थ्यांना उत्कृष्ट प्रशिक्षकाद्वारे वेगवेगळया विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. सहभागी विद्यार्थ्याचा पोलीस विभागात भरती होण्याचा उत्साह वृध्दींगत व्हावा आणि पोलीस भरती प्रक्रियेचे स्वरूप काय असते याबाबत विशेष मार्गदर्शन करण्यात आले. सदर वि

पोलीस भरती पुर्व प्रशिक्षणाचे मार्गदर्शक आणि समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. महेश्वर रेडड्ी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना पोलीस भरती बाबत मार्गदर्शन करून आणि पुढिल आयुष्यातील वाटचाली बाबत शुभेच्छा दिल्या. समोराप कार्यक्रमात श्री. मारोती इंगवले, पोलीस उपअधीक्षक (मुख्या) चंद्रपुर, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपुर जिल्हा, आदीवासी विकास विभागाचे विस्तार अधिकारी श्री. एच. झेड. गावंडे व त्यांचे इतर प्रतिनिधी, तसेच राणाज स्पर्धा क्लासेस, चंद्रपुर श्री. इर्शाद शेख आणि त्यांचे इतर सहकारी व प्रशिक्षणाकरीता आलेले १७० विद्यार्थी (मुले मुली) समारोप समारंभ कार्यक्रमात उपस्थित होते.

---